# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** उन्हाळा २०२२-२३ मधे नागपूर शहरातील विविध झोनमधे विविध
**{सा.आ.अभि. विभाग}** ठिकाणी ११५ मी.मी. व १५० मी.मी. व्यासाच्या विंधन विहीरी करण्याच्या कामाकरीता येणारा रू. १,०२,२५,३३०.०० (रुपये एक कोटी दोन लक्ष पंचेविस हजार तीनशे तीस) खर्चास (GST सह) प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. तसेच सदर कामाकरीता रितसर निविदा बोलाविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे. सदर कामाकरीता येणारा खर्च म.न.पा.चे आय व्यय पद क्र. A४३८०१९४०७०१ अंतर्गत प्रस्तावित आहे.

टिप :- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- १०/मनपा/प्रशासक** **दिनांक :- २६/०५/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१(भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानूसार उन्हाळा २०२२-२३ मधे नागपूर शहरातील विविध झोनमधे विविध ठिकाणी ११५ मी.मी. व १५० मी.मी. व्यासाच्या विंधन विहीरी करण्याच्या कामाकरीता येणारा रू. १,०२,२५,३३०.०० (रुपये एक कोटी दोन लक्ष पंचेविस हजार तीनशे तीस) खर्चास (GST सह) प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच सदर कामाकरीता रितसर निविदा बोलाविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रस्तावास तसेच सदर कामाकरीता येणारा खर्च म.न.पा.चे आय व्यय पद क्र. A४३८०१९४०७०१ अंतर्गत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**